वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नांदगाव यांचे कडील पत्र क्रमांक पसनां/शि/आ-१/६३१/०८ दिनांक २५/८/२००८

२) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/४५९/२००६ दि.६/११/२००८

३) श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापनास दिलेला खुलासा दि.१५/१२/२००८

४) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/२५७/२०१० दि.३१/७/२०१०

५) गटविकास अधिकारी पंचायत समिती निफाड यांचे कडील चौकशी अहवाल जा.क्र.पंसनि/आस्था-१/४६७/२०१६ दि.१३/५/२०१६

६) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४२४/२०१७ दि.३/५/२०१७

७) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक :-२८/८/२०१७.

---

**आदेश**

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/८५९/२०१७
दिनांक २९/८/२०१७

ज्याअर्थी श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा बिरोळे ता.नांदगाव येथे काम करीत असतांना शासकीय कामकाजात गैरवर्तणूक व नियमबाहय वर्तन केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नांदगाव यांचे कडील पत्र क्रमांक पसनां/शि/आ-१/६३१/२००८ दिनांक २५/८/२००८ अन्वये श्री.अहिरे यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक यांना संदर्भ क्र. २ मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र. शि/प्राथ-९/४५९/२००८ दि.६/११/२००८ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ बजावण्यात आले असून सदर ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला श्री.अहिरे यांनी दि. १५/१२/२००८ रोजी खुलासा सादर केलेला आहे.

ज्याअर्थी श्री.मधुकर गंभीर अहिरे यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला दिलेला खुलासा दि.१५/१२/२००८ असमाधान कारक असल्याने संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/२५७/२०१० दि.३१/७/२०१० अन्वये यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

ज्याअर्थी या आरोपाबाबत सविस्तर चौकशी करून गटविकास अधिकारी पंचायत समिती निफाड यांनी संदर्भ क्र.५ अन्वये जा.क्र.पंसनि/आस्था-१/४६७/२०१६ दि.१३/५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालावरुन चौकशी अधिकारी यांनी श्री.अहिरे प्रा.शि यांचे विरोधात असलेला एकमेव आरोप अध्यापन करतांना विद्यार्थीनीस छडीने मारहाण करणे हा आरोप सिध्द झाल्याने श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, असा अहवाल सादर केला आहे.

ज्याअर्थी श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ३ मधील कलम २ नुसार त्यांना एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता तात्पुरत्या स्वरुपात का बंद करण्यात येवू नये ? याबाबत संदर्भ क्र.६ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४२४/२०१७ दि.३/५/२०१७ अन्वये देण्यांत येवुन त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी श्री.मधुकर गंभीर आहिरे प्राथ.शिक्षक यांनी दिनांक १२/५/२०१७ रोजी खुलासा सादर केला आहे. श्री.मधुकर गंभीर आहिरे प्राथ.शिक्षक यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

त्याअर्थी श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खातेचौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.अहिरे प्रा.शि.यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ३ नियम (२) नुसार श्री.अहिरे प्रा.शि.यांची दोन वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशारितीने कायमस्वरुपी बंद करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

28/08

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रति,**

श्री.मधुकर गंभीर अहिरे प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा बिरोळे ता.नांदगाव

प्रत :- गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती नांदगाव

Scanned by CamScanner

वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती सिन्नर यांचे कडील पत्र क्रमांक पंससि/शि/आ-२/३९७/१४ दिनांक ४/९/२०१५

२) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/९७२/२०१५ दि.१६/१०/२०१५

३) श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापनास दिलेला खुलासा दि.७/११/२०१५

४) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/३५/२०१६ दि.१२/०१/२०१६

५) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा ४/खाचौ/सीआर ४८/२०१६ दिनांक १/९/२०१६.

६) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/२९७/२०१७ दि.१२/४/२०१७

७) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे दालनात सुनावणी दिनांक २८/८/२०१७

८) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक २८/८/२०१७.

---

**आदेश**

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/६६७/२०१७
दिनांक २८/८/२०१७

ज्याअर्थी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक जि.प.प्रा.शाळा,सुळेगाव ता.सिन्नर जि.नाशिक येथे काम करीत असतांना, आरोप क्र.१)जिल्हा परिषद सुळेवाडी ता.सिन्नर येथील शाळा स्वत:च्या अधिकारात बंद ठेवून विद्यार्थ्यांची गुणवत्ता खालावण्याचे कामकाज करणे, आरोप क्र.२) वरिष्टांची परवानगी न घेता स्वत:च्या अधिकारात दोन सत्रामध्ये शाळा भरविणे, आरोप क्र.३) पोषण आहार बंद करणे, आरोप क्र.४) दिनांक १५ ऑगस्ट २०१३ रोजी सायंकाळी राष्ट्रध्वज न उतरवून राष्ट्रध्वजाचा अपमान करणे याव्दारे शासकिय कामकाजात गैरवर्तणूक व नियमबाहय वर्तन केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती सिन्नर यांचे कडील पत्र क्रमांक पंससि/शि/आ-२/३९७/१४ दिनांक ४/९/२०१५ अन्वये श्री.सोनजे प्रा.शि यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांना संदर्भ क्र. २ मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/९७२/२०१५ दि.१६/१०/२०१५ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ बजाविण्यात आले असून सदर ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला श्री.सोनजे प्रा.शि यांनी दि. १२/१/२०१६ रोजी खुलासा सादर केलेला आहे.

ज्याअर्थी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला दिलेला खुलासा दि.१२/१/२०१६ असमाधान कारक असल्याने संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/३५/२०१६ दि.१२/१/२०१६ अन्वये सहाय्यक आयुक्त चौकशी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती

ज्याअर्थी या आरोपाबाबत सविस्तर चौकशी करुन मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी संदर्भ क्र.५ अन्वये क्र.विशा ४/खाचौ/सीआर/४८/२०१५ दिनांक १/९/२०१६.रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालावरुन सहाय्यक आयुक्त चौकशी तथा चौकशी अधिकारी यांनी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्दात असलेले एकूण ४ आरोपापैकी ,आरोप क्र.३ पोषण आहार बंद करणे व आरोप क्र.४ दिनांक १५ ऑगस्ट २०१३ रोजी सायंकाळी राष्ट्रध्वज न उतरवून राष्ट्रध्वजाचा अपमान करणे हे दोन आरोप सिध्द झाल्याने श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, असा अहवाल सादर केला आहे.

ज्याअर्थी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ४ मधील कलम २ नुसार त्यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने बंद का करण्यात येवू नये ? याबाबत संदर्भ क्र.६ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/२९७/२०१७ दि.१२/४/२०१७ अन्वये देण्यांत येवुन त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीसीला खुलासा सादर केला नाही.त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

ज्याअर्थी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक यांचे दालनात दिनांक २८/८/२०१७ रोजी बचावाची अंतीम संधी देण्यात आलेली आहे.

त्याअर्थी श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खातेचौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ३ नियम ४ (२) नुसार श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने बंद करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक यांचे मुळसंवापुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रति-** श्री.जिभाऊ पंडीत सोनजे प्राथमिक शिक्षक जि.प.प्रा.शा.धानपाडा ता.पेठ जि.नाशिक

प्रत :- गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती सिन्नर / पेठ जि.नाशिक

Scanned by CamScanner